महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम

गुरुवार, दिनांक १८ एप्रिल, २०१३

(सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाजता)

(अ) : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-

(दिनांक २५ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)

(१) सर्वश्री प्रताप सरनाईक, एकनाथ शिंदे, दौलत दरोडा, राजन विचारे, रुपेश म्हात्रे, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, किसन कथोरे, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"ठाणे जिल्ह्यामध्ये अनेक नवीन वस्त्या उभ्या राहत असणे, त्यामुळे मध्य रेल्वेवर, परिवहन सेवेवर तसेच खासगी वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात परिणाम होत असून मध्य व पश्चिम रेल्वेला जोडणारी वाहतूक व्यवस्था निर्माण करणे गरजेचे असणे, त्यातच ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये घोडबंदर रोडवर मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असून दिवसेंदिवस या परिसरात रहावयास येणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असणे, ठाणे-भिवंडी-कल्याण या शहरांना जोडणारी वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी दिनांक १५ मार्च, २००८ रोजी झालेल्या १२१ व्या बैठकीमध्ये या मार्गावर मोनोरेल मार्गाचा सुसाध्यता अभ्यास करण्यास तत्वतः मान्यता देण्यात येणे, सदर अहवाल तयार करण्यासाठी मे.राईटस लिमिटेड, नवी दिल्ली यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात येऊन त्यानुसार मोनोरेलचा मार्ग निश्चित करण्यात येणे व पहिला मार्ग म्हणून कापुरबावडी-भिवंडी-कल्याण असा मार्ग प्रस्तावित करण्यात येणे, सदर अहवालानुसार मोनोरेल मार्गाची लांबी २३.७५ कि.मी. असून यावर १७ स्थानके बांधण्यासाठी रुपये ३२७१ कोटी इतका खर्च अपेक्षित असणे, सदर मोनोरेल मार्गासाठी भिवंडी-निजामपूर, कल्याण-डोंबिवली व ठाणे महानगरपालिकेने संमतीदर्शक ठराव एमएमआरडीएकडे सादर करणे, ठाणे मोनोरेल प्रकल्पाला मिळणारा आर्थिक परतावा लक्षात घेता हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या परवडणारा नसल्याने शासनाने या प्रकल्पाबाबत अद्यापपर्यंत कोणताही निर्णय न घेणे, त्याचबरोबर ठाणे शहरातील घोडबंदर रोड परिसर झपाट्याने विकसित होत असून मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी व नवी मुंबई या चारही महापालिकांची हद्द ठाणे महापालिकेला जोडत असल्याने ठाणे शहरामध्ये एमएमआरडीएने ठाणे स्टेशन ते तीन हात नाका व कापूरबावडी ते कासारवडवली हा मेट्रो मार्ग प्रस्तावित करणे, जेणेकरुन मिरा-भाईंदर शहरमार्गे दहिसर या मुंबईच्या वेशीवर व तीन हात नाकापासून मुलुंड म्हणजेच मुंबईच्या वेशीवर हा मुंबई व आसपासच्या शहरांना जोडणारा मार्ग प्रस्तावित करण्यात येणे, त्यासाठी मे.कन्सल्टींग इंजिनिअरिंग सर्विसेस (इंडिया) प्रा.लि. यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात येणे, त्यानुसार सन २०१२ मध्ये मेट्रो रेल मार्गाची लांबी १०.८७ कि.मी. ठरवून १८ स्थानके निश्चित करण्यात येणे, या महत्वाकांक्षी प्रकल्पाला रुपये २०९१ कोटी

इतका खर्च येणार असून या मेट्रो रेलकरिता ठाणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेनेही मान्यता देणे, तसेच कासारवडवली येथे मेट्रो रेल्वेच्या कारशेडसाठी ४० हेक्टर भूखंडही आरक्षित करण्यात येणे, त्यानंतर ठाणे मेट्रो प्रकल्पाचे बांधकाम व उत्पन्न लक्षात घेता हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सुसाध्य नसल्याने एमएमआरडीएने हा प्रस्ताव शासनाकडे अद्याप पाठविलेला नसणे, ठाणे हे मुंबईजवळचे अतिशय मोठे शहर असताना व शहरामध्ये नागरीकरण झपाट्याने होत असताना शासनाकडून वाहतुकीच्या बाबतीत प्राधान्य दिले गेले नसल्याने शहरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, एका बाजूला पुणे व पिंपरी-चिंचवड येथील मेट्रो प्रकल्पाला केंद्र सरकारकडून सहकार्य मिळणे तर राज्य शासनाकडून अनुमती देण्यात येणे, तर दुसऱ्या बाजूला नवी मुंबई महानगरपालिका सुद्धा मेट्रो प्रकल्प सन २०१४ मध्ये राबवित असणे, नागपूरसारख्या उपराजधानीमध्ये सुध्दा मेट्रो प्रकल्पाची कार्यवाही सुरु असणे आणि मुंबईमध्ये सुद्धा मेट्रो सुरु होणार असल्याचे चित्र सध्या निर्माण झालेले असणे, असे असताना ठाणे शहराकडे मात्र एमएमआरडीएचे साफ दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येणे, मुंबईच्या वाहतुकीचा भार कमी करण्यासाठी ठाणे शहरात मेट्रो प्रकल्पाला मान्यता द्यावी अन्यथा २०९१ कोटी इतका असलेला खर्च भविष्यात ५००० कोटीवर जाण्याची शक्यता, ठाणे शहरात वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याने घोडबंदर रोडवरील शहरासाठी मोनो मेट्रो प्रकल्पास त्वरित मंजुरी देवून कामास सुरुवात करण्याची नितांत आवश्यकता, शासनाने यासंदर्भात करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २)

(२) **सर्वश्री. अशोक जाधव,** प्रशांत ठाकूर, जगन्नाथ शेट्टी, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्याचे नवे औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले असणे, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, मुंबईपर्यंत औद्योगिक कॉरिडोर स्थापन करण्याची कल्पना मांडण्यात येणे, कोकणासाठी गत दहा वर्षात केवळ घोषणाच केल्या असणे, कोकणासाठी पाच हजार कोटी रूपयांचे पॅकेज जाहीर करण्यात येणे, यापैकी जेमतेम ५० कोटी रुपये खर्च झालेले असणे, बंदर विकास, सिंचन विकास, उद्योग आदी अनेक क्षेत्रातील ज्या योजना आहेत त्या तशाच प्रलंबित असणे, गेल्या वीस वर्षात केवळ तिलारी हाच एकमेव पाटबंधारे प्रकल्प पूर्ण झाला असून उर्वरित सुमारे ७० लहान आणि मध्यम पाटबंधारे प्रकल्प अद्याप अपुरे असणे, त्यासाठी निधी मिळत नसणे, बंदर विकासाची एकही योजना सुरु झालेली नसणे, चौगुले कंपनीने नव्या सुसज्ज बंदराचा प्रारंभ जयगडला केला असणे, शासनाने विजयदूर्ग बंदराच्या विकासासाठी केलेला सामंजस्य करार अद्याप अंमलात येत नसणे, रेडी रेवस किनारा महामार्ग अद्याप पूर्ण नसणे, कोकणाचा औद्योगिक विकास साधण्यासाठी कोकणातील प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री विलास लांडे,** लक्ष्मण जगताप, आण्णा बनसोडे, बापूसाहेब पठारे, जितेंद्र आव्हाड, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मोशी येथे कचरा विघटनाचा कोणताही प्रकल्प नसल्याने सनियंत्रण समितीने ५०० मीटरचा बफर झोन जाहीर करणे, परंतु त्याठिकाणी नागरिकांनी बांधकामे केली असून महापालिकेमार्फत तेथे नागरी सुविधा पुरविण्यात येऊन नागरीक महानगरपालिकेस कर भरत असणे, आदर्शनगर, खानदेशनगर, गंधर्वनगरी या भागातील गट क्रमांक ४६२, ४६३, ४६४, ४६६ मधील ३२ हेक्टर जमिनीवर महापालिकेने कचरा टाकण्यास सुरूवात करणे, या जागेत असलेल्या गट क्रमांक ४६७ व ४६६ वर विकास योजनेअंतर्गत दिनांक १८ ऑगस्ट, २००० मध्ये सफारी पार्कचे आरक्षण टाकण्यात येणे, यामध्ये काही जागा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी वापरून ३० मीटरचा बफर झोन करण्याचा निर्णय महापालिकेने घेऊन प्रस्ताव शासनाला सादर करण्यात येणे, परंतु शासनाने दिनांक १८ ऑगस्ट, २००९च्या अधिसूचनेद्वारे ईपी क्रमांक २४ व ईपी क्रमांक ९३ प्रसिध्द करण्यात येणे, परिणामी सनियंत्रण समितीने जारी केलेल्या ५०० मीटर बफर झोनमुळे विकास योजनेतील पूर्व परवानगी घेऊन केलेली बांधकामे बाधित होणे, परिणामी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे मोशी येथील कचरा डेपो व बफर झोनमधील हद्द कमी करून बफर झोन परिसरातील नागरिकांना नागरी सुविधा देण्याची होत असलेली मागणी, सदर मागणीबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मुंबई शहरातील वांद्रे येथील "लिलावती हॉस्पिटल" हे सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटल बंद करुन त्या ठिकाणी पंचतारांकित हॉटेल उभारण्याचा डाव रचण्यात येणे, या संस्थेच्या विश्वस्त मंडळात चुकीच्या पद्धतीने आणि अवैधपणे स्वत:ला न्यासाचे विश्वस्त म्हणवून घेणारे श्री.किशोर मेहता, त्यांची पत्नी चारु मेहता, मुलगा राजीव मेहता, राजेश मेहता व प्रशांत मेहता, श्रीमती रेश्मा आर. मेहता, त्याचबरोबर या कुटुंबियांच्या सक्रिय पाठिंब्याने या कुटुंबियांचे प्रतिनिधी/दूत असल्याचा दावा करीत श्री.राजीव एम. मेहता, श्री.रविंद्र कापडिया व श्री.किरण शहा या मंडळींनी हा डाव रचणे, या मंडळींनी विश्वस्त असण्याचा चुकीचा आणि अवैध दावा सिद्ध करण्याकरिता बेकायदेशीरपणे स्टेशनरी, दैनंदिन्या, लेटरहेड, माहितीपत्रके इत्यादी सामुग्री तयार करणे, उपरोल्लेखित व्यक्ती न्यास आणि हॉस्पिटलच्या सुरळीत चाललेल्या कामकाजात विश्वस्त मंडळाच्या बैठकांमध्ये अवैधपणे घुसणे/अतिक्रमण करणे अशा प्रकारे सतत व्यत्यय आणण्याचा प्रयत्न करीत असणे, परिणामी विश्वस्त मंडळाच्या बैठका काही किंवा सगळे कामकाज न होताच सोडून द्याव्या लागत असणे वा रद्द कराव्या लागत असणे, यामुळे न्यास आणि हॉस्पिटलच्या सुरळीत कामकाजाकरिता गर्भित धोका निर्माण होत असणे, या व्यक्ती गैरमार्गाने पैसा गोळा करुन रुग्णालयावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करीत असणे, केंद्रीय गुन्हा अन्वेषण विभागाने श्री.किशोर मेहता व राजेश मेहता यांच्या विरोधात बँका आणि आर्थिक संस्था यांच्याकडून १०० कोटींपेक्षा अधिक रकमेच्या विविध सवलती मिळविणे व त्यानंतर त्यांची परतफेड न करणे या उद्देशाने खोटी कागदपत्रे दाखल करण्याबद्दल भारतीय दंड संहितेच्या (१८६०) कलम ४०६, ४२०,

४६७ आणि ४७१ त्याचबरोबर कलम १२० ब अन्वये दाखल केलेले आरोपपत्र, तसेच सन २००४ साली श्री.किशोर मेहता व त्यांच्या कुटुंबियांनी श्री.विजय मेहता यांना फसवून ४३ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स म्हणजेच २०० कोटींपेक्षा जास्त रक्कम त्यांच्या स्वित्झर्लँडमधील एका बँकेत जमा केल्याबाबतचा गुन्हा आर्थिक गुन्हे विभाग, गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडे प्रलंबित असणे, श्री.किशोर मेहता व त्यांचे कुटुंबीय/कंपन्या यांच्या विरोधात बँकांकडून परक्राम्य लेखा कायद्याच्या कलम १३८ अंतर्गत (धनादेश न वटल्याबद्दल) फौजदारी दावे दाखल करण्यात येणे, सदरची फौजदारी प्रक्रिया सुरु असताना मुंबई सार्वजनिक विश्वस्त न्यास कायदा, १९५१ च्या तरतुदीनुसार किंवा ट्रस्ट डीडच्या कलम १४ नुसार विश्वस्तांची परवानगी न घेता श्री.किशोर मेहता हे जानेवारी, २०११ मध्ये भारतातून निघून जाणे, श्री.किशोर मेहता यांच्या कुटुंबातील सदस्यांनी लिलावती हॉस्पिटल व संशोधन केंद्र यांच्यावर ताबा मिळविण्यासाठी न्यास आणि त्यांच्या विश्वस्तांच्या विरोधात आतापर्यंत ४०० पेक्षा अधिक क्षुल्लक आणि तापदायक दावे दाखल करणे, या दाव्यांमध्ये कोणत्याही न्यायालयाने त्या व्यक्ती विश्वस्त आहेत हे मान्य न करणे, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैधपणे व चुकीच्या पद्धतीने न्यासाचे विश्वस्त म्हणविणाऱ्या संबंधित मंडळींवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता."

(५) **श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **विशेष सहाय्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"गोंदिया तालुक्यात शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या संजय गांधी, श्रावणबाळ व इंदिरा गांधी निराधार योजनेत पात्रता नसलेल्या उमेदवारांना योजना मंजूर करण्यात येऊन लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च, २०१३ रोजी वा त्या दरम्यान उघडकीस येणे, यामुळे खरे लाभार्थी या योजनेपासून वंचित राहत असल्याचे आढळून येणे, या प्रकरणाचा संबंधित पोलीस स्टेशनला माहे मार्च, २०१३ रोजी वा त्या दरम्यान गुन्हा दाखल करण्यात येऊनही अद्यापही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, यामुळे पात्र लाभार्थ्यांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष, तसेच त्यांच्यावर उपासमारीची आलेली पाळी, सबब, या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची तसेच पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.बच्चू कडू, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील अपंगांच्या विविध मागण्यांसाठी अपंगांनी राज्यात सुरु केलेले आंदोलन, प्रहार संघटना तसेच अन्य अपंगांच्या संघटनांनी शासनाकडे प्रलंबित असणाऱ्या मागण्या मान्य व्हाव्यात यासाठी सुरु केलेला संघर्ष, अपंगांना अपंग दाखले मिळण्यात येणाऱ्या अडचणी, अपंगांना वित्तीय मदत देण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या महामंडळाकडे शासनाच्या होत असलेल्या दुर्लक्षामुळे एकाही अपंगाला मदत न मिळणे, अपंगांना स्वावलंबी बनण्याची इच्छा व क्षमता असतानाही त्यांना शासनाकडून सहकार्य न मिळणे, या प्रकरणामुळे सर्वच अपंगांमध्ये शासनाविषयी निर्माण झालेला तीव्र असंतोष, शासनाने अपंगांच्या मागण्यांसंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** देवेंद्र फडणवीस, सुधीर पारवे, विजय घोडमारे, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"विदर्भातील अनेक गावठाणांना लागून झुडपी जंगल क्षेत्र असणे, या जागांवर झुडपी जंगल अस्तित्त्वात राहिले नसल्याने त्या जागांवर सन १९९५ च्या पूर्वीपासून अतिक्रमण करून नागरिकांनी बांधकाम करून वसाहती तयार केलेल्या असणे, परंतु शासनाकडे या जागांची नोंद झुडपी जंगल असल्याने ही अतिक्रमणे नियमित करून तेथे कुठलीही विकास कामे करण्याकरिता अडचणी येत असणे, अनेक गावठाणांचा विस्तार यामुळे खुंटला असणे, अनेक ग्रामपंचायतींनी या झुडपी जंगल जमिनी गावठाण विस्ताराकरीता मागणी केलेले प्रस्ताव झुडपी जंगल कायद्यामुळे प्रलंबित असणे, सन १९९५ पूर्वीची अतिक्रमणे नियमित करण्याच्या शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याकरिता शासनाने केंद्र शासनाच्या वन विभागाकडे पाठपुरावा करून या झुडपी जंगल जमिनी शासनाच्या नावे करून गावठाण विस्ताराकरीता संबंधित ग्रामपंचायतींना हस्तांतरित करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

(८) **श्री. नाना पटोले**, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"गडचिरोली, गोंदिया जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात एन.आर.एच.एम. कार्यक्रमांतर्गत साहित्य खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराची रक्कम वसूल करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना दिनांक ४ मार्च, २०१३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात येणे, आय.पी.एच.एस.मधील सन २००९-१० मध्ये साहित्य खरेदीत झालेल्या गैरव्यवहारामधील ही रक्कम असणे, सदरची खरेदी ही दर करारानुसार वरिष्ठ स्तरावरुन झालेली असणे, त्यामध्ये बदल करण्याबाबतचे अधिकार जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना नसणे, खरेदी केल्यानंतर जिल्हा समितीने दर करारावर आक्षेप नोंदवणे, त्यानुसार मुख्य अधिकारी यांनी वसुलीचे आदेश काढणे, त्या आदेशामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ७ दिवसांच्या आत वसुलीची रक्कम बँकेमध्ये जमा न केल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल असे नमूद करणे, त्यामुळे ४५ वैद्यकीय अधिकारी व १२ तालुका आरोग्य अधिकारी यांच्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **श्री.एकनाथराव खडसे (पाटील), वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यात केळी उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्ह्यातील केळी फळबाग व अन्य पिकाला दुष्काळामुळे पाण्याअभावी फटका बसून उत्पादन निम्म्याने घटले असल्याचे दिनांक ६ मार्च, २०१३ रोजी उघडकीस येणे, जिल्ह्यातील चाळीसगाव, पाचोरा, भडगाव, पारोळा व अमळनेर तालुक्यातील जवळपास २५ हजार हेक्टरवरील केळी व फळबाग उत्पादन धोक्यात येणे, तसेच भडगाव व चाळीसगाव तालुक्यातील लिंबू व चिकूच्या बागाही पाण्याअभावी धोक्यात येणे, या बागा वाचविण्यासाठी पर्यायी उपाय म्हणून टँकरने पाणी आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांना टँकरमध्ये पाणी

कोठून आणावे असा पडलेला प्रश्न, जिल्ह्यातील एकाही बंधाऱ्यात किंवा धरणात पाणी नसून विहिरीही कोरड्या पडणे, शासनाकडून दुष्काळ जाहीर करण्यात आल्यानंतरही बंधारे दुरुस्ती करण्यासाठी अद्यापपर्यंत कोणतीही उपाययोजना करण्यात न येणे, परिणामी केळी व इतर पीक उत्पादक शेतकरी व जनतेत शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने या जिल्ह्यातील नुकसानग्रस्त केळी व इतर पिकांचे पंचनामे अथवा सर्व्हेक्षण करुन शेतकरी व जनतेला निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीत तातडीने योग्य ती आर्थिक मदत व इतर उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(दिनांक २२ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १०)

(१०) **डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री.** शिरीष चौधरी, शिरीष कोतवाल, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मोर्शी वरूड तालुक्यातील कृषी पंपांच्या जोडणीकरिता एकूण माहे जानेवारी २०१३ पर्यंत अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या १८२० असणे, त्यापैकी वीज जोडणी दिलेल्या अर्जदारांची संख्या ७८४ असणे, पैकी माहे मार्च, २०१२ पर्यंत शुल्क भरून जोडणी प्रलंबित असलेल्या अर्जदारांची संख्या २८९ असणे, काम सुरू असलेल्या १५२ अर्जदारांपैकी ९८ अर्जदारांकरिता वीज वाहिनी तयार नसणे, प्रलंबित १३७ अर्जदारांच्या बाबतीत काम करण्याकरिता निविदा प्रक्रिया सुरू करण्यास विलंब करणे, माहे मार्च २०१२ नंतर शुल्क भरलेल्या ११३६ प्रलंबित अर्जदारांचे कृषी पंप देणेबाबत नियोजन नसणे, शेतकऱ्यांनी वर्षापूर्वी पैसे भरूनही पंपापासून वंचित ठेवल्यामुळे सिंचन होऊ न शकणे, सिंचनाच्या अभावामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ न होणे, विशेष घटक योजनेमार्फत मागासवर्गीय शेतकऱ्यांचे विहिरींवर वीज पुरवठा करण्याकरिता शुल्क भरूनही कृषी विभागाने दिलेल्या २०६ अर्जदारांना वीज पुरवठा न करणे, त्यांच्या वीज जोडणीकरिता वाहिनी उभारण्याचे काम न करणे, समाज कल्याण विभागाचे निधी देण्याचे पाठपुरावा असल्याचे सबब देणे, मागासवर्गीय शेतकऱ्यांना कृषी पंपाच्या जोडणीपासून वंचित ठेवणे, त्यामुळे मागासवर्गीय शेतकरी सिंचन करू न शकल्यामुळे आर्थिकदृष्ट्या अधोगतीला जाणे, शेतकऱ्यांनी वर्षापूर्वी पैसे भरूनही पंपापासून वंचित ठेवल्यामुळे सिंचन होऊ न शकणे, सिंचनाच्या अभावामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ न होणे, राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेंतर्गत विद्युत जोडणीकरीता प्रलंबित अर्जदारांची संख्या १०५८ असणे, वारंवार निविदा काढूनही निविदा प्रक्रिया पूर्ण न करणे, राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेची कार्यवाही न झाल्यामुळे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील घरांमध्ये अजूनही विद्युत पुरवठा नसणे, झोपडपट्टीतील बीपीएल कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, अंधारामुळे त्यांच्या जीवितास धोका कायम असणे, विद्युततारांच्या घर्षणामुळे लागलेल्या आगीमुळे आमपेंड, इत्तमगाव, पवणी (ता.वरूड) येथील शेतकऱ्यांना अद्यापही नुकसान भरपाई न मिळणे, मोर्शी, वरूड तालुक्यातील खेड व अंबाडा परिसरातील कृषी पंपांना कमी दाबाने वीज पुरवठा केल्यामुळे संत्रापीक वाळणे, रब्बी पिकांचे नुकसान होणे, महावितरणाच्या प्रलंबित कृषी पंपांची वीज जोडणी, मागासवर्गीयांची प्रलंबित वीज जोडणी व शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीमुळे नुकसान भरपाई न देणे, कमी दाबाची वीज दिल्यामुळे शेतकरी व जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष, त्यावर करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(ब) : लक्षवेधी सुचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे :-

कामगार मंत्री : **"ठाणे, मुंबई, पुणे या शहरांमधील विविध कंपन्यातील कामगारांची कायदेशीर देणी दिलेली नसतानाही राजरोसपणे सुरु असलेली बांधकामे"** या विषयावरील विधानसभा सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०११ रोजी उत्तरित झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील प्रश्नोत्तरांदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

(क) : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) संबंधित निवेदने सभागृहासमोर ठेवणे :-

(या लक्षवेधी सूचनांची सूची जोडपत्राद्वारे वेगळी वितरीत करण्यात येईल.)

(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे -

(अ) अल्पसूचना प्रश्न

"चंद्रपूर शहर तसेच ग्रामीण भागात वादळी पावसामुळे वीज पुरवठा खंडीत झाल्याबाबत" या विषयावरील **श्री.सुधीर मुनगंटीवार**, वि.स.स यांचा अल्पसूचना प्रश्न क्रमांक १०८२२४.

(ब) गुरुवार, दिनांक ०४ एप्रिल, २०१३ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा.अध्यक्षांच्या निदेशानुसार राखुन ठेवण्यात आलेला श्री.केवलराम काळे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०७३४३ - "धारणी (जि.अमरावती) तालुक्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदीत झालेला गैरव्यवहार".

(क) तारांकित प्रश्न

(ड) (१) गुरुवार, दिनांक २८ मार्च, २०१३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(२) शुक्रवार, दिनांक १२ एप्रिल, २०१३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(ई) अतारांकित प्रश्नोत्तरांची याद्या ५४६ ते ५५१ मुद्रीत स्वरुपात व ५५२ ते ५६८ अमुद्रीत स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१) मुख्यमंत्री : महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० (सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०) च्या कलम १३ च्या पोट-कलम (१) अन्वये निर्गमित करण्यात आलेले आदेश क्रमांक टिपीएस-१८१२/ प्र.क्र.२९९/१३/नवि-१३, दिनांकित १ एप्रिल, २०१३ सभागृहासमोर ठेवतील.

(२) उप मुख्यमंत्री : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन २०११-२०१२ या वर्षाचे (१) वित्तीय लेखा अहवाल (खंड एक व दोन) (२) विनियोजन लेखा अहवाल (३) सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवाल (४) राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल (५) महसुली जमावर अहवाल (६) सार्वजनिक उपक्रम अहवाल (७) आर्थिक क्षेत्र अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) सामाजिक न्याय मंत्री : (क) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित, यांचा सन २००८-२००९ व २००९-२०१० या वर्षांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २००६-२००७, २००७-२००८ व २००८-२००९ या वर्षांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

तीन : विधानसभा आश्वासन समितीचा एकोणिसावा, विसावा व एकविसावा अहवाल सादर करणे.

चार : अनुसूचित जाती कल्याण समितीचा तिसरा अहवाल सादर करणे.

पाच : उपविधान समितीचा तिसरा अहवाल सादर करणे.

सहा : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल.

सात : विनंती अर्ज समितीचा अंतरिम अहवाल सादर करणे.

"बेंबळा प्रकल्प, यवतमाळ अंतर्गत प्रकल्पग्रस्तांच्या समस्या तातडीने सोडविण्याबाबत" या विषयावरील प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानसभा विनंती अर्ज समितीचा अहवाल मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा तथा समिती प्रमुख सभागृहात सादर करतील.

आठ : विनंती अर्ज सभागृहास सादर करणे :-

प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. : (१) **"कोहळ लघु पाटबंधारे योजना ता.नेर, जि.यवतमाळ या प्रकल्पाची घळभरणी व प्रकल्पांतर्गत बाधीत क्षेत्रातील आवश्यक कामे व समस्या संबंधी त्वरीत कार्यवाही होणेबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर करतील.

(२) **"अप्पर वर्धा प्रकल्प अंतर्गत धामणगांव रेल्वे मतदार संघातील लाभधारक शेतकऱ्यांच्या प्रलंबित समस्या/ अडचणी सोडविण्यासंबंधी"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर करतील.

नऊ : सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री यांचा म.वि.स. नियम १८३(१) अन्वये प्रस्ताव :-

"मजूर सहकारी संस्थांना सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे द्यावी किंवा कसे याबाबत परिनिरीक्षण करुन सभागृहात अहवाल सादर करण्यासाठी विधानसभा सदस्यांच्या गठीत केलेल्या तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्याची मुदत पुढील अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यापर्यंत वाढवून देण्यात यावी."

दहा : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

अकरा : अंतिम आठवडा प्रस्ताव :-

सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील), सुभाष देसाई, गणपतराव देशमुख, बाळा नांदगावकर, सुधीर मुनगंटीवार, गिरीष बापट, रविंद्र वायकर, देवेंद्र फडणवीस, गिरीष महाजन, एकनाथ शिंदे, प्रकाश महेता, विनोद घोसाळकर, मंगलप्रभात लोढा, गोपाळ शेट्टी, योगेश सागर, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री प्रविण दरेकर, शिशिर शिंदे, विवेक पंडित, भीमराव तापकीर, प्रकाश शेंडगे, विवेक पाटील, श्रीमती पंकजा मुंडे पालवे वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वय प्रस्ताव :-

"राज्यातील अनेक पाटबंधारे प्रकल्प नियोजनाअभावी वर्षानुवर्षे अपूर्ण अवस्थेत असून सिंचनातील गैरव्यवहार प्रकरणी काढण्यात आलेल्या श्वेतपत्रिकेनंतर चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या चितळे समितीला सिंचन घोटाळ्याच्या संदर्भात कोणत्याही आरोपाचा तपास करुन दोषींविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा अधिकारच नसल्याचे त्यांनी नमूद करणे,राज्यात विशेषत: शहरी भागात मोठ्या प्रमाणात सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामांमधून

वाढीस लागलेला भ्रष्टाचार,अशा अनधिकृतरित्या बांधण्यात येणाऱ्या इमारतींसाठी वापरण्यात येणारे निकृष्ट दर्जाचे साहित्य व बांधकाम शास्त्राचे उल्लंघन करुन जलदगतीने बांधकाम उरकण्याची रुढ होत असलेली पध्दत,याकडे स्थानिक स्वराज्य संस्था व शासनाच्या अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांचे होत असलेले दुर्लक्ष व अशा अवैध आणि अनधिकृत बांधकामांना मिळत असलेले अभय,प्रचलित दरापेक्षा कमी किंमतीत अशी घरे उपलब्ध होत असल्याने दुर्घटनांमध्ये त्यात राहणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांचे जात असलेले बळी,तसेच राज्यात बांधा,वापरा व हस्तांतरित करा (बीओटी) या तत्वावर बांधण्यात आलेल्या रस्त्यांवरील टोल वसुली मुदतीनंतरही रस्त्याची दुर्दशा झालेली असतानाही बेकायदेशीररित्या सुरु असून त्यामध्येदेखील मोठ्या प्रमाणात सुरु असलेला भ्रष्टाचार व गैरव्यवहार,परिणामी राज्यात सिंचन,अनधिकृत बांधकामे व बेकायदेशीररित्या होत असलेली टोल वसुली इ.बाबत योग्य ती कारवाई करण्यात शासनाला आलेल्या अपयशामुळे राज्यातील जनतेमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष,याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन जबाबदार असलेल्या संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका,तसेच मुंबई महानगर परिक्षेत्रामध्ये विविध संस्थांच्या समन्वयाअभावी रखडलेले मेट्रो व मोनोरेल, शिवडी-न्हावाशेवा सी-लिंक, वरळी-नरिमन पॉईंट सी-लिंक, पेडर रोड फ्लाय ओव्हर, एसआरएसह धारावी झोपडपट्टी पुनर्विकास योजना, पश्चिम रेल्वेचा चर्चगेट ते विरार एलिव्हेटेड मार्ग इत्यादी महत्वाचे प्रकल्प व यातील तांत्रिक व मानवी चुकांमुळे वारंवार होत असलेल्या अपघातांमुळे जात असलेले बळी व वाहतूक समस्येवर पडत असलेला ताण, मिठी नदी पुनर्विकासाच्या कामात होत असलेली दिरंगाई व गैरव्यवहारामुळे हजारो कोटी रुपये खर्च होऊन नदीच्या पुनर्वसनात शासनाला आलेले अपयश,एमएमआरडीएच्या कामात झालेल्या गैरव्यवहार व भ्रष्टाचाराबाबत श्वेतपत्रिका काढण्याची मुख्यमंत्र्यांनी केलेली घोषणा, राज्य शासनाने भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर लागू केल्यामुळे महानगरपालिकांनी मालमत्ता कराच्या रकमेची भरमसाठ वाढ केल्यामुळे जनतेचे जगणे मुश्किल होणे, मुंबईत वीज पुरवठा करणाऱ्या वीज कंपन्यांच्या वेगवेगळ्या दरांमुळे आणि वाढत्या वीज दरांमुळे समान वीज दर लागू न केल्यामुळे जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, मुंबईतील २५ हजार सोसायट्यांचे डीम्ड कन्व्हेअन्स करण्यासाठी मान्यता मिळूनही अमरावतीसह निबंधकाचे कार्यालय मुंबई येथे स्थलांतरीत करण्याबाबत शासनाला आलेले अपयश, मुंबईतील २५०० पेक्षा जास्त इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नसल्याचे उघडकीस येणे, पिंपरी-चिंचवड येथील नवनगर विकास प्राधिकरण हद्दीतील घरे नियमित करण्याबाबत, तसेच पिंपरी-चिंचवड मनपा राबवित असलेल्या जवाहरलाल नेहरु मिशन अंतर्गत स्वस्त घरकुल योजना पूर्ण करुन गरजूंना घरकुले वाटप करण्यास शासनास आलेले अपयश, पुणे विकास आराखड्यात असलेल्या त्रुटी तसेच पुण्यात मोठ्या प्रमाणात बोगस कागदपत्रांच्या आधारे सुरु असलेली अनधिकृत बांधकामे, गिरणी मालकांनी अद्यापपर्यंत शासनास व महापालिकेस जमीन हस्तांतरीत न केल्यामुळे वारंवार घोषणा करुनही गिरणी कामगारांना घरे देण्यात शासनास आलेले अपयश, मुंबई जलवाहतूक प्रकल्पामध्ये झालेला गैरव्यवहार, एमएमआरडीए क्षेत्रामध्ये भाडेतत्वावर परवडणारी घरे देण्याची घोषणा होऊनही त्यावर कार्यवाही न होणे, म्हाडास स्वस्त घरे योजना राबविण्यात आलेले अपयश, राजीव आवास योजनेंतर्गत केंद्र शासनाने झोपडपट्टी नियमित करण्याची डेडलाईन सन २००० पर्यंत वाढवूनही राज्य शासनाने सन १९९५ या डेड लाईनमध्ये सुधारणा करण्यात शासनास आलेले अपयश, मुंबई, नवी मुंबई,ठाणे, वसई-विरार या भागांमध्ये असंख्य बांगलादेशी व पाकिस्तानी नागरिकांना आधारकार्ड वाटप झाल्याचे उघडकीस येणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

(दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर)

बारा : शासकीय विधेयके :-

(१) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, २०१३.

(२) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३.

(क) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, दादाराव केचे, अतुल देशकर, विजयकुमार देशमुख, संजय राठोड, गोपाळ शेट्टी, योगेश सागर, प्रकाश महेता, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अनिल राठोड, विजय शिवतारे, महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री.भिमराव तापकीर, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.प्रकाश शेंडगे, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २२० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ट) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पंडित, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १११ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ठ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विनोद घोसाळकर, प्रकाश (बाळा) सावंत, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ड) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री बबनराव घोलप, धनराज महाले, दादाजी भुसे, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ढ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री एकनाथ शिंदे, प्रताप सरनाईक, दौलत दरोडा, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ९१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ण) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. विजयराज शिंदे, ॲड. आशिष जयस्वाल, डॉ.संजय रायमुलकर, श्री.संजय गावंडे, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(त) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, श्री. धैर्यशील पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(३) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे, विचार, खंडश: विचार व संमत करणे -

(क) **सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विजय शिवतारे, चंद्रकांत मोकाटे, विजय औटी, अनिल राठोड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष देसाई, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राजेश क्षीरसागर, डॉ.सुजीत मिणचेकर, श्री.चंद्रदीप नरके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री प्रकाश (बाळा) सावंत, चिमणराव पाटील, विवेक पंडित, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ट) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री बबनराव घोलप, धनराज महाले, अनिल कदम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ठ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुर्यकांत दळवी, सदानंद चव्हाण, भरतशेठ गोगावले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ८१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ड) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संतोष सांबरे, श्रीमती मिरा रेंगे-पाटील, सर्वश्री संजय शिरसाठ, आर.एम.वाणी, ज्ञानराज चौगुले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ठ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजयराज शिंदे, डॉ.संजय रायमुलकर, कॅ.अभिजीत अडसुळ, श्री.अशोक शिंदे, ॲड.आशिष जयस्वाल, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, संजय राठोड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

तेरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(मंगळवार दिनांक १६ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ३)

(१) श्री. गोपाळ शेट्टी, वि.स.स.

"नागपूर शहरातील विकास योजनेतील हरितपट्टयातील अंतर्गत असलेले भूखंड गुंठेवारी अधिनियम, २००१ नुसार कार्यवाही करण्याबाबत" या विषयावरील **श्री.देवेंद्र फडणवीस व इतर वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०१६२३ ला दिनांक १२ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.

"चंद्रपूर जिल्ह्यातील हुमन नदी प्रकल्पाच्या नेट प्रेझेंट व्हॅल्युच्या रकमेमध्ये वाढ झाल्याबाबत" या विषयावरील **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७९३८१ ला दिनांक २५ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(३) श्री.गोवर्धन शर्मा, वि.स.स.

"**राज्यातील महामार्गवरील टोल वसुलीतून जनतेची लूट होत असल्याबाबत**" या विषयावरील **श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.** यांचा दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ५१२ मधील प्रश्न क्रमांक ८४९८६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

गत सत्रातील प्रलंबित (सूचना क्रमांक ४ व ५)

(४) श्री.विजयराज शिंदे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यभरातील देवस्थान इनाम वर्ग ३ च्या जमिनी ज्या इनामदारांना देण्यात आल्या होत्या त्या जमिनी बहुतांश ठिकाणी मूळ इनामदारांकडे नसणे, सदर जमिनीवर इतरांनी अवैधपणे कब्जा केलेला असून काही ठिकाणी तर सात-बारा व महसूल दप्तरात नियमबाहय नोंदी केलेल्या असणे, देवस्थान वर्ग ३ चे मूळ इनामदार यामुळे त्यांच्या हक्कापासून वंचित होणे, त्यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा निर्माण झालेला प्रश्न,

त्यांचेवर उपासमारीची आलेली वेळ, इनामदारांना शासनाचे कोणतेही संरक्षण नसल्याने सद्य:स्थितीत ज्या जमिनी मूळ इनामदार किंवा त्यांच्या कुटुंबियांकडे आहेत त्या जमिनीही हडप करण्याचे इतरांनी चालविलेले प्रयत्न, देवस्थान इनाम वर्ग-३ च्या जमिनीव्यतिरिक्त इतर इनाम जमिनी (जसे देशमुख, देशपांडे, महार व इतर) खालसा करुन शासनाने त्या त्या इनामदारांना किंवा त्यांच्या वारसांना कायमस्वरुपी हक्काने दिलेल्या असणे, त्याचप्रमाणे देवस्थान इनाम वर्ग ३ च्या जमिनी खालसा करुन मूळ इनामदार किंवा त्यांच्या वारसांना कायमस्वरुपी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.देवेंद्र फडणवीस , वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर येथील गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाबाबत वर्षांनुवर्षे होऊनही कोणतीही प्रगती झाली नाही, त्रुटी दूर करुन सन २००९ मध्ये ७२० कोटी रुपयांचा आराखडा परत सादर करण्यात आला आहे, पी.पी.पी. तत्वावर प्रकल्प राबविण्याचे निश्चित होत आहे, राज्य व केंद्राचा निधी केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाची परवानगी व रेस्क्यु सेंटरला सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीची प्रतिक्षा आहे, विदर्भाचा भौगोलिक व वनसंपदेचा विस्तार लक्षात घेता व्यावहारिक दृष्टया यशस्वी होणाऱ्या प्रकल्पाकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष."

(दिनांक १४ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या, तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्रमांक ६ व ७)

(६) **श्री. विजय घोडमारे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर शहरातील सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल ट्रान्सप्लांट युनिट ३ वर्षापासून बंद असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, किडणी स्टोनच्या उपचारासाठी असलेले लिथोट्रिप्सी मशिन तंत्रज्ञाअभावी बंद असणे, मेयो आधुनिकीकरणाची प्रक्रिया मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, या वर्षी मेयोचा अपेक्षित विकास न झाल्याने एम.बी.बी.एस.च्या ४० जागा कायम रद्द होण्याचा संभाव्य धोका टाळण्यासाठी विकास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मेयो प्रशासनाने वैद्यकीय संचालनालयाकडे पत्र देणे, मेडीकल प्रशासन कॅन्सरग्रस्तांच्या बाबतीत उदासीन असल्याने प्रतिक्षा यादी मोठ्या प्रमाणात वाढणे, रेडिओथेरपी तंत्रज्ञांची कमतरता असणे, राज्यात नागपूर येथे एम.डी. रेडिओथेरपी हा पदव्युत्तर अभ्यासक्रम असणे, या अभ्यासक्रमाकरिता यंत्र सामुग्रीची पूर्तता केलेली नसणे, संस्थेतील कोबाल्ट यंत्रही जुने झाल्याने क्षमता ५०% पेक्षा कमी झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(७) **श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"भटक्या व विमुक्त (धनगर) समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गठीत रेणके आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात विलंब होणे, राज्यात धनगर समाजाची लोकसंख्या सुमारे दीड कोटी असून ९०% लोकांकडे हक्काची जमीन नसणे, धनगर समाजाला विकासाअभावी शासकीय योजनांचा फायदा मिळू न शकणे, तसेच कायदेशीर व्यवसाय नसल्याने समाज गुन्हेगारीच्या चक्रात फसणे, धनगर समाज सर्वात गरीब, निरक्षर आणि

वंचित घटक असून ९८% लोक बेघर व भूमिहीन असणे, त्यामुळे धनगर समाजाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीमध्ये अडथळा निर्माण होणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना"

(दिनांक २१ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या, तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्रमांक ८ व ९)

(८) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये आणि शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हावे या मूळ उद्देशातून राबविण्यात येत असलेले सर्व शिक्षा अभियान यशस्वी करण्यासाठी करार कर्मचारी विषयतज्ञ (साधनव्यक्ती) यांनी अहोरात्र परिश्रम घेणे, राज्यभरात या योजनेअंतर्गत कंत्राटी पध्दतीने सुमारे २० हजार कर्मचारी कार्यरत असणे, राज्यात कंत्राटी पध्दतीने ६-६ महिने कालावधीत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन सदर कर्मचारी गत १२ वर्षांपासून कार्यरत असणे, या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबतची मागणी प्रलंबित असणे,राज्यातील सर्व करार कर्मचारी हे उच्च शैक्षणिक अर्हताधारक असून कामाचा प्रदीर्घ अनुभव त्यांना असणे, सदर करार कर्मचाऱ्यांची नियुक्ती गुणवत्ता तसेच बिंदुनामावली नुसार शासकीय भरती प्रक्रियेच्या विहित नियमावलीप्रमाणे जिल्हा निवड समितीमार्फत विविध पदांवर करण्यात येणे, राज्यातील बऱ्याच सुशिक्षितांनी या प्रकल्पात काम करताना शासकीय सेवेसाठीची विहित वयोमर्यादा ओलांडणे, केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार सर्व शिक्षा अभियानातील उत्तम कार्याबद्दल महाराष्ट्र हे देशातील तिसऱ्या क्रमांकाचे राज्य असल्याचे जाहीर असणे, या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याच्या मागणीकडे राज्य शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष."

(९) **श्री. संजय भेगडे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त्या करण्यात आलेल्या ग्रामरोजगार सेवकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागणे, कृषी पदवी, पदविका उत्तीर्ण तसेच उच्चशिक्षित असलेल्या ग्रामरोजगार सेवकांना अत्यल्प वेतनावर काम करावे लागणे, नियोजन विभागाच्या दिनांक २ मे २०११ च्या शासन निर्णयामध्ये ग्रामरोजगार सेवकांचे काम अर्धवेळ स्वरूपाचे असेल असे नमूद असतानाही त्यांना रात्रंदिवस काम करावे लागणे, वाढत्या महागाईच्या काळात त्यांना केवळ सव्वादोन टक्के कमिशनवर कुटुंबाची गुजराण करावी लागणे व त्यांना आर्थिक हालअपेष्टांचा सामना करावा लागणे, त्यांना त्यांच्या शैक्षणिक योग्यतेनुसार शासनसेवेत सामावून घेण्यात यावे या व अन्य मागण्या शासनदरबारी प्रलंबित असणे, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

(गुरुवार, दिनांक ४ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या, तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्रमांक १० व ११)

(१०) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर सुधार प्रन्यासाने आरक्षित केलेले भूखंड आरक्षणातून वगळण्याचा अधिकार नागपूर सुधार प्रन्यासच्या सभापतींना असूनसुध्दा आरक्षित भूखंड मोकळे केलेले नसणे, नागपूर येथील नो शॉपिंग स्ट्रीट सारख्या अव्यवहार्य योजनांमुळे विकासात निर्माण झालेला अडसर, २२ ले आऊटचा प्रस्ताव प्रलंबित असणे, नागपूर शहरातील ५७२ व १९०० ले आऊट मधील विकास कामे अपूर्ण असणे, अनेक ले आऊटची विकास कामेच सुरु झालेली नसणे, नागरी सुविधांअभावी रहिवाश्यांची गैरसोय होत असणे, नागपूर सुधार प्रन्यासाने वर्षभरात गुंठेवारी अंतर्गत एकही अभिन्यास मंजूर न करणे, वर्धा रोडवरील गैरकृषी वापराची परवानगी गावठाणापासून ७५० मीटरवर देण्याचा प्रस्ताव प्रलंबित असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(११) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

" सूरजकुंड (हरियाणा) मेळाव्याच्या धर्तीवर राज्यात देखील सूरजकुंडसारखा सर्व सुखसोयीनी युक्त असा शिल्पग्राम प्रकल्प राबविण्याबाबत मौ.मजासगाव ता.अंधेरी येथील न.भू.क्र.१९०/ब मधील मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असलेला भूखंड महामंडळाकडे वर्ग करण्याबाबत दिनांक ३१ जुलै, २००७ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना विनंती करणे, उक्त जमिनीचे मनोरंजनाचे मैदान (आर जी) म्हणून असलेले आरक्षण बदलून ते शिल्पग्राम करणेबाबतचा प्रस्ताव महामंडळातर्फे दिनांक २४ ऑगस्ट, २००७ रोजीचे पत्रान्वये नगरविकास विभागास सादर करण्यात येणे, या योजनेसाठी १२ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार निधी प्राप्त झाल्याचे २९ ऑगस्ट, २००७ रोजीच्या पत्रान्वये कळवूनही अद्याप जागेच्या आरक्षणाबाबत कोणताच निर्णय झालेला नसणे, सदर जमीन अद्याप महामंडळाच्या ताब्यात मिळालेली नसल्यामुळे पुढील कार्यवाहीस विलंब होणे, उपरोक्त प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होवून तीन-चार वर्षाचा कालावधी उलटूनही केवळ जागेअभावी शिल्पग्रामचे काम अद्यापही प्रलंबित असणे, सदर प्रकल्पाचे काम तातडीने सुरू होण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(मंगळवार, दिनांक १६ एप्रिल, २०१३ रोजीच्या बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र. १२ ते १४)

(१२) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील ओ.बी.सी आणि व्ही.जे.एन.टी. विद्यार्थ्यांना पोस्टमॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे सुमारे ११०० कोटी रुपये शासनाने वितरित न करुन विद्यार्थ्यांवर अन्याय केल्याची घटना नुकतीच उघडकीस येणे, केंद्र शासनाद्वारे राज्य शासनाच्या माध्यमातून दिली जाणारी ही शिष्यवृत्ती मागील दोन वर्षांपासून प्रलंबित असणे, ओ.बी.सी. आणि

व्ही.जे.एन.टी. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वितरित करण्यात सरकार जाणूनबुजून विलंब करीत असून हळूहळू ही योजना बंद करण्याचा शासनाचा कट उघड होणे, केंद्र शासनाने ११ ऑगस्ट, २०११ रोजी राज्याला कळविलेल्या निर्णयानुसार शिष्यवृत्तीचे नवे दर तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. तथा बी.सी.सी.ए. तसेच इतर नवे अभ्यासक्रम त्याच्यामध्ये समाविष्ट करण्यात आले असले तरी राज्य शासनाने या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, ओ.बी.सी. नॉन क्रिमीलेयरची उत्पन्न मर्यादा ७ लाख रुपये करण्याबाबत तसेच ई.बी.सी. सवलतीकरिता उत्पन्न मर्यादा ४.५० लाख इतकी करण्याकरिता वारंवार मागणी होत असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१३) श्री. प्रकाश शेंडगे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"धनगर आणि भटक्या विमुक्त जाती व जमाती यांना एसटीच्या सवलती लागू कराव्यात यासाठी विविध आयोग स्थापन करण्यात येणे, या आयोगाने आपले अहवाल देणे, कालेलकर आयोग, बापट आयोग, अग्रवाल आयोग आदी आयोग असणे, अग्रवाल आयोगाची मुदत दि. ३० मार्च, २०११ रोजी संपणे, या आयोगाने गेल्या ६ वर्षामध्ये कोणत्याही बैठका न घेणे, केंद्र शासनाने घोषित केलेल्या अनुसूचित जमातींच्या महाराष्ट्र राज्याच्या यादीत धनगर समाजाचा समावेश असणे, तथापि समावेश करताना धनगर या शब्दातील 'र' या अक्षराऐवजी 'ड' या अक्षराचा चुकीने वापर करणे, त्यामुळे राज्यातील धनगर समाज अनुसूचित जातीच्या सवलतींपासून वंचित राहणे, या समाजाला एसटीच्या सवलती त्वरित लागू कराव्यात यासाठी अनेक संघटनांनी वारंवार राज्याच्या प्रत्येक जिल्हयामध्ये, मुंबईमध्ये मोठेमोठे मोर्चे काढून सरकारकडे निवेदन दिलेले असणे, राज्याच्या तत्कालीन मुख्यमंत्री यांचेकडे यासंबंधीचे सर्व पुरावे सादर केलेले असणे, यामुळे राज्यातील धनगर आणि भटक्या विमुक्त जाती व जमाती या संवर्गामध्ये राज्य शासनाविरोधी तीव्र असंतोष पसरलेला असणे, परंतु याबाबतीत आजतागायत निर्णय न लागणे, याकडे राज्य शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने करावयाची तातडीने कार्यवाही व उपाययोजना."

(१४) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे विभाजन करुन पूर्व विदर्भासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील मुल येथे कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची नितांत आवश्यकता, कृषी विद्यापीठाच्या स्थापनेच्या दृष्टीने मुल तालुक्यात सर्व अनुकूल बाबी उपलब्ध असणे, अमरावती आणि नागपूर विभागातील पीक पद्धती वेगवेगळी असणे, त्यामुळे निर्माण झालेला असमतोल लक्षात घेता नागपूर विभागात पूर्व विदर्भासाठी कृषी विद्यापीठ स्थापन करणे गरजेचे असणे, पूर्व विदर्भातील धान उत्पादक प्रदेशामध्ये हे कृषी विद्यापीठ स्थापन झाल्यास शेतकऱ्यांच्या जीवनात नवे परिवर्तन घडणार असल्याने अकोला येथील पंजाबराव कृषी विद्यापीठाचे विभाजन करुन पूर्व विदर्भात मुल येथे कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

चौदा : अर्धा-तास सूचनेची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे :-

सार्वजनिक आरोग्य मंत्री : **"राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी पध्दतीने कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत"** या विषयावर सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार व इतर वि.स.स. यांनी दिनांक ३० मार्च, २०११ रोजी उपस्थित केलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचनेवरील चर्चेदरम्यान देण्यात आलेल्या निदेशानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

" राष्ट्रगीत "

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १७ एप्रिल, २०१३.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.